क्र. पोमसं/३०/३३/वेतनश्रेणी प्र.अ./१०७/२०१२ मुंबई, दि. ११ /०१/२०१९

संदर्भ :- १) शासन अधिसुचना वित्तविभाग क्र. वेपुर-२०१७/प्र.क्र.१२/ सुधारणा -८७/सेवा-९ दि.१९/०५/२०१७

२) शासनपत्र,गृहविभाग क्र.पोलीस -१८१४/प्र.क्र.१५३/पोल-५अ,दि.२९/०९/२०१७

३) या कार्यालयाचे समक्रमांकाचे दि.१२/१०/२०१७ चे परिपत्रक

४) म.शासन,गृहविभाग,शासन परिपत्रक क्र.पोलीस १८१४/(प्र.क्र.१५३/२०१४)/पोल ५ अ.दि.०२/०१/२०१९

विषय :- पोलीस हवालदार संवर्गाची दिनांक १ जानेवारी २००६ पासून सुधारित वेतननिश्चिती करुन त्याप्रमाणे त्यांना देय थकबाकी देण्याच्या कार्यपध्दतीबाबत.

*****

परिपत्रक :-

उपरोक्त विषयांवरील महाराष्ट्र शासन गृहविभाग,शासन परिपत्रक क्र.पोलीस १८१४(प्र.क्र.१५३/२०१४)/पोल-५अ दिनांक ०२ जानेवारी २०१९ ची प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

२. तरी सर्व पोलीस घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांचे अधिपत्याखाली असलेल्या सर्व "पोलीस हवालदार " संवर्गातील कर्मचा-यांना सदर शासन निर्णयाप्रमाणे थकबाकी अदा करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही त्वरेने करावी.

( अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, (बृहन्मुंबई ) (सस्नेह)
महासंचालक,अॅन्टी करप्शन ब्युरो,महाराष्ट्र राज्य मुंबई.
आयुक्त,राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई.
अपर पोलीस महासंचालक,विशेष कृती दल, महाराष्ट्र राज्य मुंबई.
अपर पोलीस महासंचालक,गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे
अपर पोलीस महासंचालक व संचालक,पोलीस बिनतारी संदेश ,महाराष्ट्र राज्य पुणे
अपर पोलीस महासंचालक प्रशि.व खास पथके/ना.ह.स./लोहमार्ग/रारापोबल/वाहतुक/द.वि.प.म.रा.मुबंई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
सचांलक,महाराष्ट्र पोलीस अकादमी ,नाशिक.
विशेष पोलीस महानिरीक्षक,फोर्स वन,मुंबई /विशेष सुरक्षा विभाग,मुबंई /म.अ.प्र.वि.मुंबई/न.वि.अ.नागपुर
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक /मो.परिवहन,म.रा.पुणे/रा.रा.पो.बल,पुणे/नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक,(जिल्हा/लोहमार्ग/बिनतारी संदेश/मोटार परिवहन/विशेष कृती दल सह)
सर्व समादेशक,राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १६.
सर्व प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण विद्यालये/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,वडाची वाडी, पुणे.
उपसंचालक,गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय,नाशिक.
पोलीस अधीक्षक,अे.सी.बी.,पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/ठाणे/नांदेड/अमरावती.
पोलीस अधीक्षक,गु.अ.वि.औरंगाबाद/नागपूर /नाशिक/ठाणे/नांदेड/अमरावती/कोल्हापूर
अपर उप आयुक्त,रा.गु.वि.पुणे/नाशिक/कोल्हापूर/अमरावती/औरंगाबाद/ठाणे/नागपूर/नांदेड.

प्रत.

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रंमाक. ६,३३,३६

पोलीस हवालदार संवर्गाची दिनांक १ जानेवारी २००६ पासून सुधारित वेतननिश्चिती करुन त्याप्रमाणे त्यांना देय थकबाकी देण्याच्या कार्यपद्धतीबाबत..

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक : पोलीस १८१४/(प्र.क्र.१५३/२०१४)/पोल ५-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ०२ जानेवारी, २०१९

गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलीस हवालदार हा संवर्ग पोलीस नाईक या संवर्गाचे पदोन्नतीचे पद असल्यामुळे त्या संवर्गास शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ सोबतच्या प्रपत्रातील अ.क्र. ९ येथील शिफारशींच्या अनुषंगाने पदोन्नतीच्या आणि निम्न पदाच्या वेतनसंरचेमध्ये फरक ठेवण्यासाठी पदोन्नतीच्या पदास म्हणजेच पोलीस हवालदार या संवर्गास वित्त विभाग, शासन अधिसूचना, दिनांक १९ मे, २०१७ अन्वये रु.१००/- अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले आहे. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक : वेपूर-१२०९/प्र.क्र. २७/सेवा-९, दिनांक २२ एप्रिल, २००९ प्रमाणे पोलीस हवालदार या संवर्गातील कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती दिनांक १ जानेवारी, २००६ रोजी करुन, त्यानुषंगाने त्यांना रोखीने थकबाकी दयावी किंवा कसे यावाबत गृह विभाग, पत्र क्रमांक पोलीस १८१४/प्र.क्र. १५३/पोल-५अ, दिनांक २९ सप्टेंबर,२०१७ अन्वये कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि, याबाबत क्षेत्रिय कार्यालयांकडून वारंवार विचारणा होत असल्याने, तसेच अधिदान व लेखा कार्यालयाचे आक्षेप असल्याने याबाबत पुन:श्च खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

<u>शासन परिपत्रक</u> :-

शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल, २००९ पासून सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम १५ अन्वये दिनांक १ जानेवारी, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या कालावधीत शासकीय

Desk 30 3/1/19

Fr n.a. 3/1/19

4 3/1/2019

03/1/19 Shri. Dharma put up for perusal & circulate to all units urgently.

कर्मचारी वेतनाची थकबाकी मिळण्यास पात्र असल्यास, सदर रक्कम पुढील पाच वर्षात समान हप्त्यात निर्वाह निधीमध्ये जमा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, पोलीस हवालदार या संवर्गास वित्त विभाग, शासन अधिसूचना, दिनांक १९ मे, २०१७ अन्वये रु.१००/- अतिरिक्त ग्रेड वेतन मंजूर करण्यात आले असल्याने, दिनांक १ जानेवारी, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या कालावधीतील थकबाकीची रक्कम पाच वर्षात समान हप्त्यात भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करणे सद्यस्थितीत व्यवहार्य ठरणार नाही. यास्तव संबंधित कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी, २००६ पासून उपरोक्त आदेशान्वये मंजूर केलेल्या सुधारित वेतनसंरचनेत वेतननिश्चिती करण्यात यावी व दिनांक १ जानेवारी, २००६ ते दिनांक ३१ मार्च, २००९ या कालावधीतील अनुज्ञेय थकबाकी एकरकमी भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी तसेच वित्त विभाग, शासन अधिसूचना, दिनांक १९ मे, २०१७ अन्वये वेतनाचे प्रत्यक्ष लाभ दिनांक १ एप्रिल, २००९ पासून देण्यात यावे.

सदर परिपत्रक वित्त, विभाग, अनौपचारिक संदर्भ क्रमांक २२७/२०१८/सेवा-९, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ नुसार दिलेल्या निदेशास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या                    या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१९०१०२१६१५२८४३२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

V. M. Bhat

**( व्यं.मा.भट )**

उप सचिव, गृह विभाग

महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई